Prop. Vasant B. Udeg



# SHREE DATTA AGENCIES

☎02355 - O.260436, 261949, 261188, 329611
Mob. 0-9822121670

Mirjoli Sakharwadi, Abatai Building, Chiplun, Dist. Ratnagiri.

Authorised Dealers : A.C.C. Cement, Shakti Cement Sheets, R.A.K. Ceramic City Tiels Ltd., Safari Sanitary ware, Goldline bath fitting, Nirali Steel sink & all building materials



SUN-O-A | RAK CERAMICS | CITY TILES | SHAKTI | India's No. 1 NIRALI

मी वसंत बाळाराम उदेग, वय ४८, मु. कळवंडे, ता. चिपळूण, जिल्हा रत्नागिरी, व्यवसाय बिल्डींग मटेरियल सप्लायर्स व आंबा शेती.

वडिलांची पूर्वीपासून शेती व्यवसायामध्ये जिध्द व चिकाटी होती. गरिबी असूनसुध्दा सुमारे ३५ ते ४० वर्षापूर्वी (सन १९७०-७५) स्वतः डोक्यावरून पाणी आणून झाडांना पाणी घालून झाडे जगविली. १० ते १२ वर्षांनी झाडांना हापूस आंबे येऊ लागले. त्याचप्रमाणे पुढील ५ वर्षे आंबे मिळू लागले. त्यानंतर मात्र २००६ सालापर्यंत हापूस आंबे लागणे बंद झाले. आंब्याच्या बागेतून आंब्यांचे उत्पादन पूर्णतः बंद झाले. पाहुण्यांना भेट म्हणून आंब्याची पेटी देण्यासाठी बाजारातून विकत आंबे घ्यावे लागत असत.

सन २००७ मध्ये कोकण भूमी प्रतिष्ठान मार्फत मा. श्री. विजय जोगळेकर साहेब व मा. श्री. श्रीकांत फडके साहेब यांची भेट झाली. त्यांनी मला कोकण भूमी प्रतिष्ठानच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्य हापूस आंबा मिशन, पर्यटन विकास इत्यादी अनेक गोष्टी समजावून सांगीतल्या त्यातील आंबा उत्पादन घेण्याचा विचार मनात पक्का केला. कारण आमच्या बागेत वडिलांची हापूस आंब्याची ६०० झाडे आहेत. त्यातील ३०० झाडांवर प्रयोग केले. त्यांनी शोधून काढलेल्या झाडांना पाणी घालण्यासाठी डिफ्यूजर पध्दती हीच खरी योग्य पध्दत आहे असे गेल्या ३ वर्षातील अनुभवावरून सिध्द झाले आहे. डिफ्यूजर खाली ४ इंच वर म्हणजेच जमिन लेव्हल खालीपाणी देणे म्हणजे बाष्पीभवन टाळून पाण्याची उत्पादकता वाढविणे होय. झाडाच्या सभोवताली ३ X १ X १ खड्डे मारून त्यामध्ये वर्षभरासाठी लागणाऱ्या खतांचे नियोजन करून ते झाडाला सहज शोषून घेण्यासाठी उपलब्ध करणे. झाडाच्या पालवी क्षेत्रफळानुसार झाडांची उत्पादनक्षमता निश्चित करणे व त्यातून दरवर्षी अपेक्षित आंब्याचे उत्पादन मिळवणे हे तंत्र गेली ३ वर्षे सतत सिध्द झाले आहे.

सन २०१० मध्ये प्रति एकर आंब्याचे उत्पादन ८ ते ९ टन इतके मिळाले यावर्षी सुध्दा जवळपास तितकेच मिळेल फक्त उशीरापर्यंत पडलेल्या पावसामुळे उत्पादन गेल्या वर्षीच्या तुलनेत १५ ते २० दिवस उशीरा आहे.

मा. श्री. जोगळेकर साहेब व मा. श्री. फडके साहेब यांनी कोकण भूमी प्रतिष्ठानच्या माध्यमातून चालविलेल्या संपूर्ण कोकण वासियांसाठी कोकण मँगो मिशन बद्दल माहिती समजावून सांगितली आणि त्याचंया मध्ये जागृती केली यावर्षी त्यातील प्रत्येक शेतकऱ्याने उत्पादनात लक्षणीय वाढ केलेली दिसत आहे. दिवसेंदिवस भूमी प्रतिष्ठानने राबविलेल्या उपक्रमास जास्तीतजास्त प्रतिसाद मिळत आहे.

श्री. वसंत बाळाराम उदेग
मु. पो. कळवंडे, ता. चिपळूण,
जि. रत्नागिरी.
मो.: ९८२२१२१६७०